**बलात्कार (Rape) / बालकांवरील लैंगिक अत्याचार (Sexual Assault) आणि ॲसिड हल्ल्यातील (Acid Attack) पिडित महिला आणि बालकांना अर्थसहाय्य व पुनर्वसन करण्यासाठी " मनोधैर्य " योजनेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**महिला व बाल विकास विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-२०११/ प्र.क्र.६ / का-२,**

नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला,

मंत्रालय, मुंबई-४०००३२.

दिनांक: २५ नोव्हेंबर, २०१३.

वाचा :-

1) **शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग, क्रमांक : संकीर्ण-२०११/ प्र.क्र.६ / का-२ दिनांक २१.१०.२०१३.**

**शासन निर्णय :-** बलात्कार / बालकांवरील लैंगिक अत्याचार / ॲसिड हल्ल्यातील पिडीत महिला व बालक यांना पुन:स्थापक न्यायाची खात्री देण्यासाठी महाराष्ट्र राज्यात "मनोर्धर्य" ही योजना दिनांक २.१०.२०१३ पासून सुरु करण्याबाबतचा शासन निर्णय दिनांक २१ ऑक्टोबर, २०१३ रोजी निर्गमित करण्यात आला आहे. केंद्र शासनामार्फत सदर योजनेची अंमलबजावणी सुरु होईपर्यंत या योजनेवरील खर्च खालील लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

" मागणी क्र. एक्स-१, २२३५- सामाजिक सुरक्षा व कल्याण, ०२-समाज कल्याण, १०३-महिला कल्याण, (२४)(०१) पिडित महिला आणि बालक " मनोधैर्य " योजना ३१ - सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर) (दत्तमत) (२२३५ बी-१८३) (योजनांतर्गत)"

२. आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना या योजनेसाठी **नियंत्रक अधिकारी** आणि सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांना **आहरण व संवितरण अधिकारी** म्हणून घोषित करण्यात येत आहे.

३. वरील लेखाशिर्षाअंतर्गत नियमित तरतूद प्राप्त होईपर्यंत शासन ज्ञापन, वित्त विभाग, क्र. आकनि-२०१३/१५/अर्थसंकल्प-७, दिनांक २५ नोव्हेंबर, २०१३ अन्वये महाराष्ट्र शासनाच्या आकस्मिकता निधीमधून रु.१०,००,०००/- (रुपये दहा लाख फक्त) इतक्या रक्कमेस मंजूरी देण्यात आली आहे. त्याचा आकस्मिकता निधी सांकेतांक क्रमांक (८००००६८४५) आहे. आकस्मिकता निधीतून मंजूर उपरोक्त तरतूद दिनांक ५.१२.२०१३ पर्यंत खर्च करण्याची दक्षता आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे यांनी घ्यावी आणि अग्रिमामधून  प्रत्यक्ष मासिक खर्च केल्याची एकत्रित माहिती लगतच्या महिन्यानंतरच्या १५ तारखेपर्यंत वित्त विभागास पाठवावी. आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे तथा नियंत्रक अधिकारी यांनी , आकस्मिकता निधीमधून खर्च करण्यासाठी आहरण व संवितरण अधिकाऱ्यांकडे रक्कम सुपूर्त करण्यासंबंधीच्या आदेशात / पत्रात आगाऊ रकमेतून खर्च करताना सादर करण्यात येणाऱ्या देयकावर आकस्मिकता निधी / अग्रीम शासन ज्ञापन, वित्त विभाग क्र: आकनि-२०१३/१५/अर्थसंकल्प-७, दिनांक २५ नोव्हेंबर, २०१३ अन्वये मंजूर असे लाल शाईने लिहावे अशा स्पष्ट सूचना त्या आदेशात / पत्रात अंतर्भूत करावी व ही सूचना लाल शाईने अधोरेखित करावी.

४. त्याचप्रमाणे पिडीत महिला व बालक  निधी अभावी अर्थसहाय्य मिळण्यापासून वंचित राहू नयेत, यासाठी दिनांक २.१०.२०१३ ते दिनांक ३१.३.२०१४ या कालावधीत उपरोक्त लेखाशिर्षाखाली निधी उणे (वजा) प्राधिकारपत्र काढण्याची सोय बीम्स प्रणालीवर उपलब्ध करुन देण्यात येत आहे. या योजनेखाली पिडित महिला व बालकांना अदा केलेल्या अर्थसहाय्याची जिल्हानिहाय माहिती प्रत्येक महिन्यात वित्त विभागाकडे सादर करण्यासाठी शासनास सादर करण्याची आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय,पुणे यांनी दक्षता घ्यावी. उणे (वजा) प्राधिकारपत्र उपलब्ध करुन देण्याची सोय ही फक्त दिनांक ३१.३.२०१४ पर्यंतच मर्यादित आहे. त्यामध्ये कोणत्याही  निश्चित अशा रकमेचा समावेश नाही. दिनांक २.१०.२०१३ ते दिनांक ३१.३.२०१४ या कालावधीत विनियोग केलेल्या निधीची पुरवणी मागणी मार्च, २०१४ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात सादर करण्यासाठी आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे यांनी कालमर्यादेत प्रस्ताव सादर करण्याची दक्षता घ्यावी.  त्याचप्रमाणे सन २०१४-१५ च्या अर्थसंकल्पामध्ये या योजनेसाठी विहित मार्गाने नियमित तरतूद उपलब्ध करुन घ्यावी.

५. हा शासन निर्णय वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र.५९०/१३/व्यय-६ आणि अनौपचारिक संदर्भ क्र.३५०/कोषा प्रशा-५, दिनांक ६.११.२०१३ अन्वये प्राप्त सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१३११२५१५२३५१४४३० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Mahendra Babusing Hajari

Digitally signed by Mahendra Babusing Hajari
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Women & Child Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Mahendra Babusing Hajari
Date: 2013.11.26 17:38:52 +05'30'

**म.बा. हजारी**

उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई
२. मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.उपमुख्यमंत्र्यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा.मंत्री, महिला व बाल विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा.राज्यमंत्री, महिला व बाल विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. मा.सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
७. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
८. सर्व अप्पर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई.

९. मा. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई

१०. (२.) सदर शासन निर्णयास यथोचित प्रसिध्दी द्यावी.

११.मा. पोलीस महासंचालक, पोलीस मुख्यालय, मुंबई.

१२. (२.)वरील शासन निर्णय राज्यातील सर्व पोलीस अधिकारी यांच्या निदर्शनास आणण्याबाबत कार्यवाही करावी.

१३.महाप्रबंधक, उच्च न्यायालय, मुंबई.

१४.प्रबंधक, मा.उच्च न्यायालय, मुंबई / नागपूर / औरंगाबाद.

१५.विशेष पोलीस महानिरिक्षक, महिला अत्याचार प्रतिबंधक कक्ष, पोलीस मुख्यालय, मुंबई.

१६.सर्व निबंधक, उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर / औरंगाबाद.

१७.सर्व जिल्हा न्यायाधिश, जिल्हा न्यायालय, (संबंधित जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांचेमार्फत)

१८. सर्व निवासी उप जिल्हाधिकारी, (संबंधित जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांचेमार्फत)

१९.सचिव, महाराष्ट्र राज्य बालहक्क संरक्षण आयोग, वरळी, मुंबई

२०.सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई.

२१.व्यवस्थापकीय संचालक, महिला आर्थिक विकास महामंडळ, मुंबई.

२२.महालेखापाल १/२, (लेखा व अनुज्ञेयता)/ (लेखा परिक्षा), मुंबई / नागपूर.

२३.सर्व विभागीय आयुक्त, महिला व बाल विकास,

२४.आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

२५.(२.)वरील शासन निर्णय महिला व बाल विकास विभागाअंतर्गत सर्व क्षेत्रिय अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणावा.

२६.सर्व जिल्हा न्यायाधिश, (संबंधित जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांचेमार्फत)

२७.सर्व जिल्हाधिकारी, (संबंधित जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांचेमार्फत)

२८. सर्व पोलीस आयुक्त (शहरी), (संबंधित जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांचेमार्फत)

२९.सर्व पोलीस अधिक्षक (ग्रामीण), (संबंधित जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांचेमार्फत)

३०.सर्व विभागीय उप आयुक्त, महिला व बाल विकास विभाग

३१.सर्व जिल्हा शल्य चिकित्सक, (संबंधित जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांचेमार्फत)

३२.अधिष्ठाता, सर.जे.जे.रुग्णालय, मुंबई

३३.अधिष्ठाता, कामा रुग्णालय, मुंबई.

३४.जिल्हा सरकारी वकील, (संबंधित जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांचेमार्फत)

३५. सचिव, महाराष्ट्र राज्य समाजकल्याण सल्लागार बोर्ड, मुंबई.

३६.सर्व सरकारी वकील / सरकारी अभियोक्ता, उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ, नागपूर / आरैंगाबाद. (संबंधित जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांचेमार्फत)

३७.सर्व बाल विकास प्रकल्प अधिकारी (जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांचेमार्फत)

३८. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई शहर / मुंबई उपनगर

३९.वरिष्ठ जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे.

४०.सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,

४१.वित्त विभाग, व्यय-६ / कोषा प्रशा-५ / अर्थसंकल्प-७, मंत्रालय, मुंबई.

४२.नियोजन विभाग, कार्यासन-१४७२ / कार्यासन-१४११

४३.सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी,

४४.अवर सचिव (अर्थसंकल्प), महिला व बाल विकास, मंत्रालय, मुंबई.

४५.सर्व उप सचिव / अवर सचिव / कक्ष अधिकारी, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

४६.निवड नस्ती/का-२.